आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०० वाजता
७ ऑक्टोबर २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- जनतेचा विश्वास आणि कोट्यवधी कार्यकर्त्यांचा समर्पणभाव हीच आपली मोठी ऊर्जा असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- रिझर्व बँकेनं केली रेपो दरात पाव टक्के वाढ/ चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत जीडीपी वाढीचा दर ७ पूर्णांक १ दशांश टक्के राहण्याचा अंदाज

- रसायन शास्त्रासाठीचा नोबेल पुरस्कार यंदा फ्रान्सचे हेन्री कागान आणि जपानचे केन्सो सोय यांना जाहीर

**आणि**

- भारतीय महिला क्रिकेट संघाचं कर्णधारपद स्मृती मंधानाकडे

**<><><><><>**

जनतेचा विश्वास आणि कोट्यवधी कार्यकर्त्यांचा समर्पणभाव हीच आपली मोठी ऊर्जा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्याला आज २५ वर्षे पूर्ण झाली. तेव्हापासून आधी राज्य सरकारचे आणि त्यानंतर केंद्र सरकारचे प्रमुख म्हणून ते गेली सलग २५ वर्षे कार्यरत आहेत. यानिमित्तानं आज नवी दिल्ली इथं झालेल्या विकसित भारत संकल्प सभेला त्यांनी संबोधित केलं, त्यावेळी ते बोलत होते. सरकार प्रमुख म्हणून गेल्या २५ वर्षांत कमावलेला जनतेचा विश्वास आणि या काळात आलेला अनुभव हीच आपली मोठी संपत्ती असल्याचं त्यांनी सांगितलं.

**- - -होल्ड बाईट - MODI SEVASANKALP - -**

गेल्या १२ वर्षांत देशाची परिस्थिती पूर्णपणे बदलली असून, आता भारत निर्यातीत नवे विक्रम रचत आहे, आज मेड इन इंडिया मोबाईल फोन्सनी जागतिक बाजारपेठ व्यापली आहे, कृषी क्षेत्रातही सर्वोच्च आणि शाश्वत वाढ झाली आहे, असं ते म्हणाले. जेव्हा धोरणांमध्ये स्पष्टता असते, तेव्हाच असे बदल शक्य होतात असं त्यांनी सांगितलं. आता भारताच्या उभारणीसाठी मोठी ध्येय बाळगण्याची हीच योग्य वेळ आहे असं ते म्हणाले. ७ ऑक्टोबर २००१ ला आपण गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती, त्यावेळी या टप्प्यापर्यंत

पोहचू असा विचार केला नव्हता, मात्र जनतेच्या आशीर्वादानं आणि पाठिंब्यानंच हे शक्य झालं अशी भावना त्यांनी व्यक्त केली. याबद्दल त्यांनी देशवासियांचे, भाजपा आणि लोकशाहीवर श्रद्धा असलेल्या सर्व राजकीय सहकाऱ्यांचे आभारही मानले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनीही सलग २५ वर्षांच्या राष्ट्रसेवेबद्दल प्रधानमंत्र्यांचं अभिनंदन केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जनसेवेलाच आपल्या आयुष्याचं एकमेव उद्दिष्ट मानलं, त्यांनी राजकारणाकडे राष्ट्रसेवेचं माध्यम म्हणून पाहिलं अशा शब्दांत त्यांनी प्रधानमंत्र्यांचा गौरव केला.

**<><><><><>**

यानिमित्तानं राज्यातही अनेक ठिकाणी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. प्रधानमंत्र्यांच्या कारकिर्दीतली ही २५ वर्षे विकासाची, समर्पणाची, मानवकल्याणाची आणि भारताला नव्या क्षितिजावर नेणारी असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत बातमीदारांशी बोलताना सांगितलं. भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्याचा प्रधानमंत्र्यांचा संकल्प पूर्ण करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**- - होल्ड - बाईट - मुख्यमंत्री - - -**

नवी मुंबईत नेरूळ इथं 'सेवा ज्योती यात्रा', 'नमो सेवा संकल्प' आणि 'विकसित भारत संकल्प सभा' आयोजित करण्यात आली.

नाशिक, धुळे, अहिल्यानगर, बीड, सांगली, आणि इतरत्रही विकसित भारत संकल्प सभा, सेवा ज्योत यात्रा, वृक्षारोपण असे उपक्रम आयोजित केले होते.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं आज रेपो दरात पाव टक्के वाढ करत, तो साडेपाच टक्के केला. रिझर्व्ह बँकेची द्वैमासिक पतधोरण आढावा बैठक मुंबईत झाली, त्यानंतर गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी वार्ताहरांना सांगितलं, की जागतिक अनिश्चिततेच्या वातावरणात चलनफुगवट्यावर नियंत्रण आणण्याच्या उद्देशानं हा निर्णय घेतला आहे. बँकेनं यापूर्वी फेब्रुवारी २०२३मध्ये रेपो दरात वाढ केली होती. ऑगस्ट महिन्यात ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित चलन फुगवट्याचा दर ४ पूर्णांक ८२ शतांश टक्क्यावर पोहोचला; त्या आधी जुलै महिन्यात हा दर ४ पूर्णांक ४५ शतांश टक्के इतका होता.

चालू आर्थिक वर्षात जीडीपी, अर्थात स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर ७ पूर्णांक १ दशांश टक्के राहील. तर, किरकोळ किंमत आधारित चलन फुगवट्याचा दर ५ पूर्णांक २ दशांश टक्के राहील असा अंदाज आरबीआयनं वर्तवला आहे.

<><><><>

रसायन शास्त्रासाठीचा नोबेल पुरस्कार यंदा फ्रान्सचे हेन्री कागान आणि जपानचे केन्सो सोय या वैज्ञानिकांना जाहीर झाला आहे. असममित सेंद्रीय संश्लेषणात होणारे अनेकरेषीय परिणाम आणि स्वयंउत्प्रेरण यातल्या संशोधनाबद्दल त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे. आधुनिक रसायनशास्त्रासाठी, विशेषतः औषधनिर्माण विकासासाठी, हा एक महत्त्वाचा शोध आहे.

१२ दशलक्ष स्वीडिश क्रोनरचा हा पुरस्कार दोन्ही विजेत्यांना विभागून दिला जाईल.

<><><><>

भारतीय महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी अनुभवी फलंदाज स्मृती मंधाना हिची नियुक्ती झाली आहे. हरमनप्रीत कौरनं काल कर्णधारपदावरुन पायउतार होण्याचा निर्णय घेतल्यानंतर क्रिकेट नियामक मंडळानं मंधानाची निवड केली. स्मृती मंधाना २०१३ पासून भारतासाठी खेळत आहे. तिनं १८ टी ट्वेंटी सामन्यांमधे आणि ४ एकदिवसीय सामन्यांमधे कर्णधारपदाची धुरा सांभाळली आहे.

<><><><>

जपानमधे नुकत्याच झालेल्या आशियाई क्रीडास्पर्धांमधे पदक मिळवणाऱ्या ६ महिला खेळाडू पश्चिम रेल्वेच्या सेवेत असून आज मुंबईत त्यांचा सत्कार करण्यात आला. सुवर्ण पदक विजेत्या संघातल्या हॉकीपटू नवनीत कौर आणि सुनेलिता टोप्पो, कबड्डीपटू सोनाली शिंगटे आणि राजराणी तसंच नेमबाज सोनल मस्कर आणि कुस्तीगीर अंतिम पंघाल यांचा त्यात समावेश होता. या सोहळ्यात या ६ जणींनी आपापले अनुभवही कथन केले.

<><><><>

तंत्रज्ञान हे सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाचं साधन बनलं पाहिजे, असं मत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं. त्यांनी आज नवी दिल्लीत होणाऱ्या इंडिया मोबाईल काँग्रेसच्या निमित्तानं ग्लोबल सिस्टिम फॉर मोबाईल कम्युनिकेशन असोसिएशनच्या संचालक मंडळ सदस्यांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. समाजाचा कोणताही घटक

विकासापासून वंचित राहू नये याची खात्री करण्यासाठी तंत्रज्ञानाचं लोकशाहीकरण आवश्यक आहे, असं ते म्हणाले. ग्लोबल साऊथ देशांसाठी  तंत्रज्ञान आणि डिजिटल सेवा परवडणाऱ्या आणि सहज उपलब्ध होण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

**<><><><><>**

भारतीय वायू दल योग्य दिशेनं वाटचाल करत आहे, मात्र सध्याच्या तुलनेत वाटचालीचा वेग आणखी वाढवला जाऊ शकतो, असं मत वायू दल प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग यांनी व्यक्त केलं. भारतीय वायू दलाच्या ९४व्या स्थापना दिनाच्या पूर्वसंध्याला नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. वेगानं विकसित होत असलेल्या तंत्रज्ञानाच्या युगात वायू दलानं आपल्या क्षमता वाढवण्याची गरज आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

बॅडमिंटनमध्ये, भारताची पुरुष दुहेरीतली जोडी कृष्ण प्रसाद गरगा आणि पृथ्वी कृष्णमूर्ती रॉय यांनी अत्यंत चुरशीच्या लढतीत आर्क्टिक ओपन सुपर ५०० स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत आज प्रवेश केला. फिनलंडमधे वांता इथं ही स्पर्धा सुरू आहे.

//<><><><><>//